दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३३५ वा ▶ रविवार दि. १ ऑक्टोबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

शासकीय कर्मचाऱ्यांचे होणार जातीनिहाय सर्वेक्षण

मुंबई । राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी कर्मचाऱ्यांचे शासकीय नोकऱ्यांमध्ये प्रमाण कमी असल्याचा

अहवाल काल ओबीसी समाजाच्या बैठकीत सादर केला. त्यामुळे आता राज्यातील शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या जातनोंदी तपासल्या जाणार आहेत. राज्य मागासवर्गीय आयोग आणि मुख्य सचिवांकडून हे सर्वेक्षण केले जाणार आहे. यामध्ये अनुसूचित जाती जमाती, ओबीसी, मराठा, अशा सर्व समाज घटकांमधील किती कर्मचारी सरकारी सेवेत आहेत. याचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

अजितदादा यांना मोठ्या आवाजात बोललो : छगन भुजबळ यांची कबुली

कशावरून पडली वादाची ठिणगी?

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यात वादाची ठिणगी पडल्याची जोरदार चर्चा आहे. अजितदादांशी मी मोठ्या आवाजात बोललो अशी कबुलीही छगन भुजबळ यांनी दिली आहे. मात्र, हा वाद नाही. संघर्ष नाही. तर दोन भावांमध्ये जशी चर्चा होते, तशीच ही चर्चा होती, असं भुजबळ यांनी म्हटलं आहे. भुजबळ यांच्या या विधानावरून आता राजकीय वर्तुळात तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. भुजबळ मीडियाशी संवाद साधत होते.

मी बैठकीत दिलेली आकडेवारी गायकवाड आयोगाची होती. सरकारमध्ये नोकरीत घेतांना आरक्षणाचा अनुशेष बाकी आहे, याकडे मी लक्ष वेधलं. नोकरीत अनुशेष दिसतोय, हे मी सांगत असतांना अजितदादांनी सेक्रेटरींना याबाबत विचारलंय सचिवांनी अशी काही माहिती नसल्याचं सांगितलं. माझ्या बोलण्यानंतर अजितदादा म्हणाले, अशी काही माहिती नाही आणि ती सत्य नाही. त्यामुळे मी उत्स्फूर्तपणे बोललो, की तुमच्याकडे माहिती नाही, असं होऊ शकत नाही. त्याच्यावरून थोडीशी बोलचाल झाली. मात्र त्याचा पराचा कावळा करण्यात आला, उगाचच राई का पहाड केला गेला, असं छगन भुजबळ म्हणाले. निवडणूक चिन्ह आणि पक्ष यावरही त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. एक-दोन आमदार आणि ४४ आमदार यात फरक आहे. ८० टक्के असतील तर त्यात फरक आहे. घड्याळ चिन्हं गोठवल जाणार याची माहिती नाही. जयंत पाटील देखील म्हणाले, की आमचा पक्ष फुटलेला नाही. फक्त पक्षांतर्गत अध्यक्ष आणि इतर निवडणुका असतात. आमची खात्री आहे पक्षाचं चिन्हं आणि सर्व गोष्टी आमच्याकडे राहतील, असंही त्यांनी सांगितलं. पैसे देवून ओबीसींमध्ये नोंदी केल्या जात असल्याचा दावा केला गेला आहे. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. अशा प्रकारावर सरकारी अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. अशा नोंदी घेतल्यामुळे पुण्यात काही नगरसेवक निवडून आले आहेत. त्यांना कोर्टात जावं लागलं. चुकीचे प्रमाणपत्र दिलं जात असेल, तर ते तातडीनं थांबवण्याची गरज आहे, अशी मागणी त्यांनी केली.

माजी आमदार रमेश कदम यांनी छगन भुजबळ यांच्यावर मोठा आरोप केला होता. भुजबळ यांनी तुरुंगात असताना शरद पवार यांना ब्लॅकमेल केले होते, असा दावा रमेश कदम यांनी केला होता. भुजबळ यांनी हा आरोप फेटाळून लावला आहे. मला सांगा कसं ब्लॅकमेल केलं? ब्लॅकमेल केलं असेल तर पवार साहेबांनी सांगावं, असं आव्हानच त्यांनी दिलं. मी आजारी होतो. हॉस्पिटलमध्ये जावून कागदपत्रं तपासा ना. आपण घरच्यांना सांगतो, साहेबांना जावून सांगा. मदत मागतोचं ना आपण? रमेश कदम यांना ब्लॅकमेल शब्दाचा अर्थ माहित नसावा, असा चिमटाही त्यांनी काढला.

गणपतीच्या दर्शनाला गेले नाही

भुजबळांनी यावेळी अजित पवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरच्या गणपतीच्या दर्शनाला गेले नसल्यामुळे ते नाराज असल्याच्या चर्चेत कोणतेही तथ्य नसल्याचेही स्पष्ट केले. अजित पवार त्या दिवशी खूप व्यस्त होते. त्यांच्या कार्यक्रमांना खूप उशीर झाला. मुख्यमंत्र्यांनी सायंकाळी ६.३० चे निमंत्रण दिले होते. पण त्यांना उशीर झाल्यामुळे ते गेले नसतील. त्यातून वेगळा अर्थ काढण्याची काहीच गरज नाही, असे ते म्हणाले.

पैसे देवून ओबीसीच्या नोंदी

विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पैसे देवून ओबीसी प्रमाणपत्र देण्यात असल्याचा आरोप केला आहे. भुजबळांनी यावर भाष्य करताना असे करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर लक्ष देण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. पैसे देवून ओबीसीमध्ये नोंदी घेतल्यामुळे पुण्यात काही नगरसेवक निवडून आलेत. त्यांना कोर्टात जावे लागले. चुकीचे प्रमाणपत्र दिले जात असेल, तर ते तातडीने थांबवण्याची गरज आहे, असे भुजबळ म्हणाले.

आमच्यात मतभेद नाहीत

छगन भुजबळ म्हणाले की, माझ्यात व अजित पवारांत कोणतेही मतभेद नाहीत. मी माझा मुद्दा काहीसा मोठ्या आवाजात मांडला एवढेच. तो मुद्दा तिथेच संपला आहे. एका घरात दोन भावांची चर्चा होती तशी आमच्यात चर्चा झाली. त्यात खिंडार, अंतर्गत संघर्ष किंवा लढाई असे काही नाही.

न्यूज कॉलम

कंटेनरची धडक; दुचाकीस्वार ठार

धुळे । मुंबई- आग्रा महामार्गावरील गोराणे (ता. शिंदखेडा) शिवारात भरधाव कंटेनरने दुचाकीला उडविले. त्यात एक जण ठार तर, एक गंभीर जखमी झाला. माळीच (ता. शिंदखेडा) येथील देवीदास छबीलाल पाटील व जितेंद्र दिलीप पाटील (वय ३५) हे दोघे २७ सप्टेंबरला सकाळी साडेसातच्या सुमारास दुचाकीने (एमएच १८ एएम १७०५) बाभळे येथील कंपनीत कामावर जात होते. यादरम्यान त्यांच्या दुचाकीला गोराणे शिवारात माळीच फाट्यानजीक मागून भरधाव आलेल्या कंटेनरने (एनएल ०१ एन २०१३) जोरदार धडक दिली.

दुचाकी अपघातात एक ठार, एक जखमी

धुळे । भरधाव दुचाकीच्या धडकेत दुसरा दुचाकीस्वार ठार, तर बालक जखमी झाला. शरद माधवराव पाटील (वय ३०) असे मृत, तर मंथन पाटील (दोघे रा. वारूळ, ता. शिंदखेडा) जखमीचे नाव आहे. शरद पाटील हे दुचाकीने (एमएच १८ बीबी ३३२७) मुंबई - आग्रा महामार्गावरून वारूळकडे जाताना पिंप्राड शिवारात भरधाव दुचाकीने (एमएच १९ बीडी ६५८७) जोरदार धडक दिली. त्यात ते ठार झाले, तर मंथन जखमी झाला.

नाशिकमध्ये २० ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवणार

भारतीय जनता युवा मोर्चाची माहिती

नाशिक । प्रतिनिधी

भारतीय जनता युवा मोर्चा नाशिक महानगराची बैठक भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या सुचनेनुसार वसंतस्मृती कार्यालय येथे संपन्न झाली. युवा मोर्चा हा भारतीय जनता पक्षाचा आत्मा आहे, हे लक्षात घेऊन प्रत्येक युवा कार्यकर्त्याने कंबर कसून काम करावे तसेचप्रदेशावरून आलेल्या सर्व उपक्रम आणि कार्यक्रमांचे सुयोग्य नियोजन करून ते अंमलात आणावे, असे आवाहन नाशिक महानगर युवा मोर्चाचे नवनिर्वाचित अध्यक्ष सागर शेलार यांनी केले.

नाशिकच्या ९ मंडलातील युवा मोर्चा अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सुचना देतांना अध्यक्ष सागर शेलार म्हणाले की, नमो चषक, स्वच्छता अभियान, मेरी माटी मेरा देश, सरल ॲप नोंदणी आणि नमो ॲप नोंदणी हे सर्व उपक्रम प्रत्येक युवा मंडल अध्यक्षाने आपापल्या मंडलात करावे. तसेच १७ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर या सेवा पंधरवाडय़ात प्रदेशाने दिलेले रक्तदान शिबिर, पं. दीनदयाल उपाध्याय जयंती यशस्वी आयोजन केले होते. आज दि. १ ऑक्टोबर रोजी नाशिकमध्ये २३ ठिकाणी युवा कार्यकर्ते नाशिकमधील राष्ट्र पुरुषांचे पुतळे व स्मारक स्वच्छता तसेच महत्त्वाचे परिसर स्वच्छता करणार आहेत, युवा वॉरियर्स शाखा मधील कार्यकर्ते यांच्याशी संपर्क करून या सर्वांसोबत युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी काम करावे, असे आवाहन सागर शेलार यांनी केले आहे.यावेळी नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश क्रिडा संयोजक विजय बनछोडे आणि प्रदेश सचिव तथा माजी युवा मोर्चा अध्यक्ष अमित घुगे यांनी बैठकीत मार्गदर्शन केले.

यावेळी निखिलेश गांगुर्डे, सुमित नहार, नागेश पिंगळे, डॉ. ऋषीकेश अहिरे, शिवा जाधव, डॉ.वैभव महाले, शैलेश साळुंके, प्रविण भाटे, प्रशांत वाघ, अनिकेत कदम, विनोद येवले, विशाल पगार, ऋषी नारद, विक्रांत गांगुर्डे, प्रसाद धोपावकर, अमोल पाटील, अनिकेत सोनवणे, किरण गाडे, ड.पवन गुरव, पवन उगले, आदित्य दोंदे, भाविक तोरवणे, विशाल पगार, भगवान बरके आदिसह युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

पैगंबर जयंतीनिमित्त निघाली भव्य मिरवणूक

धुळे । प्रतिनिधी

ईद-ए-मिलाद सणानिमित्त मुस्लिम बांधवांनी शहरात भव्य मिरवणूक काढली. हातात हिरवे झेंडे घेत आग्रारोडवरुन काढण्यात आलेल्या या मिरवणुकीने धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले होते. मिरवणुकीत हजारो मुस्लिमबांधवांनी सहभाग नोंदवला. मिरवणूक मार्गावर राजकीय पक्षाच्या पदाधिकार्यांनी मिरवणुकीचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या. दरम्यान, पोलीस प्रशासनातर्फे शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

हजरत मोहंमद पैगंबर यांचा जन्मदिवस अर्थात ईद-ए-मिलाद निमित्त मुस्लिम बांधवातर्फे शहरात मिरवणूक काढण्यात आली. मच्छिबाजार येथून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत आ.फारुख शाह यांच्यासह माजी नगरसेवक शव्वाल अन्सारी, नगरसेवक अमिन पटेल, मुजफ्फर हुसेन, गुफरान पोपटवाले, डॉ.सरफराज अन्सारी यांनीही सहभाग नोंदवला. या मिरवणुकीत मुस्लिमबांधव प्रचंड संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीत डीजे, मिनी डीजे तसेच लाऊड स्पिकरवर इल्म, नात पठण सुरु होते. तसेच अल्लाह हू अकबर...च्या घोषणा देत ही मिरवणूक आग्रारोडमार्गे दाता सरकार दर्ग्याकडे मार्गस्थ होत होती. मिरवणुकीत तरुणांसह लहान मुला-मुलींचा सहभागही लक्षणीय होता. ही मिरवणुक मच्छिबाजार येथून बारापत्थरमार्गे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, आग्रारोडने प्रभाकर चित्रमंदिर, पाचकंदिल, शहर पोलीस चौकी, सराफबाजार, कराचीवाला चौक, फुलवाला चौक, महात्मा गांधी पुतळामार्गे दाता सरकार दर्गा व ईदगाह मैदान येथे दाखल झाल्यानंतर नमाज पठण करण्यात आले. त्यानंतर सर्व मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर धुळे जिल्हा पोलीस दलातर्फे चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. खुद्द जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड हे देखील रस्त्यावर उतरले होते. त्यांच्यासमवेत अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, विभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे, आझादनगरचे पीआय नितीन देशमुख, एलसीबी पीआय हेमंत पाटील आदींसह पोलीस अधिकारी व कर्मचारी परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.

स्थायी समितीच्या सभेला ११ सदस्यांसह दोन सभापती गैरहजर

तरीही सर्व विषयांना मंजुरी

धुळे । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवारी झाली. सभेला ११ सदस्य आणि २ दोन सभापती गैरहजर होते. त्यानंतरही सभेचे कामकाज झाले तसेच सर्व सात विषयांसह आयत्या वेळेच्या विषयांना मंजूरी दिली.

शासनाने ईदची सुटी शुक्रवारी जाहीर केली होती. पण जिल्हा परिषद स्थायी समितीची सभा पुर्व नियोजीत तारखेनुसार शुक्रवारी यशवंतराव चव्हाण सभागृहात झाली. अध्यक्षा अश्विनी पवार अध्यक्षस्थानी होत्या. या वेळी उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, शिक्षण सभापती महाविरसिंह रावल, समाज कल्याण सभापती कैलास पावरा यांच्यासह कुसुम निकम आणि सत्यभामा मंगळे हे दोनच सदस्य उपस्थित होते. उर्वरित ११ सदस्य अनुपस्थितीत होते. त्यानंतरही सभेचे कामकाज पार पडले. विषय समितीचा आढावा घेण्यात आला. शिक्षण सभापती महाविरसिंह रावल यांनी धमाणे येथील वैद्यकीय अधिकारी पवार यांना कार्य मुक्त करण्याची मागणी केली. त्यावर जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सचिन बोडके म्हणाले की, डॉ. पवार यांच्या विरोधात असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. विविध विषयावर चर्चा झाली. चिमठाणे ते साळवे, चिमठाणे ते गांगेश्वर आणि चिमठाणे ते सवाई मुकटीपर्यंतचा रस्ता दुरुस्तीसाठी निविदा काढण्यात आली आहे. पण ही निविदा कमी दराची असल्याने काम दर्जेदार होणार नाही असे स्पष्ट करत निविदा रद्द करुन नव्याने राबवावी, अशी मागणी सदस्या कुसुम निकम यांनी केली. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश ठाकुर यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

धुळ्यात काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांच्या जवाहर सूतगिरणीवर छापा

पथकाकडून कागदपत्रांची तपासणी

धुळे । प्रतिनिधी

मोराणे (ता.धुळे) येथील जवाहर शेतकरी सहकारी सूतगिरणीवर आयकर विभागाने सकाळी आठच्या सुमारास छापा टाकला. काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल पाटील सूतगिरणीचे अध्यक्ष असुन तपास पथकाकडून कागदपत्रांची तपासणी सुरू असल्याची माहिती पुढे आली. आमदार कुणाल पाटील यांच्याकडे नऊ वर्षांपासून सूतगिरणीचे अध्यक्षपद आहे.

पोलीस यंत्रणेसह नाशिक येथील एका तपास यंत्रणेचा ताफा पहाटे सूतगिरणी जवळ धडकला. त्यामुळे जवाहर सूतगिरणीसह परिसरात खळबळ उडाली. पथक नेमक्या कोणत्या विभागाचे, याबद्दल मात्र गुप्तता बाळगण्यात आली. या पथकातील काही अधिकाऱ्यांनी सूतगिरणीच्या आवारात प्रवेश करतानाच मुख्य प्रवेशद्वारावर असलेल्या सुरक्षा रक्षकांचे मोबाईल ताब्यात घेतले. सूतगिरणी व्यवस्थापनासह काही भ्रमणध्वनींसह इतर संपर्क यंत्रणा खंडित करण्यात आली. पथकाने परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात केला. त्या ठिकाणचे दुरध्वनी जोडणीही बंद केली, त्यामुळे कोणाशी संपर्क करणे शक्य नव्हते. पथकातील अधिकाऱ्यांनी सूतगिरणी व्यवस्थापकांच्या निवासस्थानीही तपासणी केल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, आमदार पाटील यांनी सांगितले की, जवाहर सूतगिरणीवर कोणत्या तपास यंत्रणेने छापा टाकला, याची मला कल्पना नाही. जवाहर सूतगिरणी मध्ये असलेली सर्वच संपर्क यंत्रणा बंद करण्यात आली. सूतगिरणीचे लेखापरीक्षण झाले असून त्यात कुठलाही दोष आढळलेला नाही, असेही त्यांनी सांगितले. धुळे जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदार संघातून काँग्रेसतर्फे निवडून आलेले कुणाल पाटील हे एकमेव काँग्रेसचे आमदार आहेत. केंद्र आणि राज्यात असलेल्या सत्तेचा गैरवापर करुन भाजपकडून ईडीसह इतर यंत्रणांचा धाक दाखवला जात असल्याचा आरोप विरोधकांकडून कायमच करण्यात येतो. काँग्रेसचे आमदार कुणाल पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश करावा म्हणून याआधी त्यांना गळाला लावण्याचेही प्रयत्न झाल्याचेही सांगण्यात येते. पाटील यांच्याकडे नऊ वर्षांपासून सूतगिरणीचे अध्यक्षपद आहे. धुळे तालुक्यातील मोराणे शिवारात ही सूतगिरणी आहे. शनिवारी पहाटे पोलीस कुमकसह धडकलेल्या ताफ्याने सूतगिरणीत खळबळ उडाली. हे पथक नेमक्या कोणत्या विभागाचे, याबद्दल गुप्तता बाळगण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना पीककर्ज वाटपात जिल्हा बँक अव्वल!

बँकेची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

धुळे । प्रतिनिधी

जिल्हा बँकेने चालू वर्षी ३४ हजार ३७० शेतकरी सभासदांना ३४८.६१ कोटींचे कर्जवाटप करुन जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. लक्षांका पेक्षा १२३ टक्के जास्तीचे कर्ज वाटप केल्याचे सांगत बँक लवकरच क्युआर कोडची सुविधा ग्राहकांसाठी सुरु करणार आहे. तसेच बँक मध्यम मुदत शेती कर्ज वाटपाच्या प्रमाणात वाढ करणार असल्याचे बँकेचे चेअरमन तथा माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांनी सभेत जाहिर केले.

धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ६६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा अग्रवाल विश्राम भवन येथे झाली. यावेळी चेअरमन, माजी आ. कमदबांडे यांच्यासह जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धिरज चौधरी, संचालक प्रभाकर चव्हाण, राजेंद्र देसले, प्रा. शरद पाटील, दर्यावगीर महंत, शामकांत सनेर, भगवान पाटील, भरत माळी, संजय पाटील, हारसिंग पावरा, शिला पाटील आदी उपस्थित होते. यावेळी माजी आ. कदमबांडे यांनी बँकेचा लेखाजोखा मांडला. तसेच चालू वर्षी पीक कर्जाची वसुली स्वेच्छेने परतफेड केल्यामुळे मार्च अखेर ९६ टक्के कर्जवसुली केल्यामुळे सर्व शेतकरी सभासदांचे व १०० टक्के पीक कर्ज वसुली देणार्या वि.का.सह. संस्थांचे जाहीर आभार मानले. बँकेने आर.बी.आय.च्या मापदंडा नुसार ९ टक्के सीआरएआर राखण्याची अट असतांना २७.५९ टक्के राखून उच्चांक राखला आहे. नाबार्ड निर्देशानुसार शेतकर्यांच्या हितासाठी शंभर टक्के कर्जवाटप एमटीएम आणि मायक्रो एटीएमद्वारे केले आहे. केंद्र सरकार व्याज सवलत योजनेतंर्गत चालू वर्षी मार्च अखेर ६.५० टक्के व्याज भरणा करुन शासनाकडून भरलेले व्याज डायरेक्ट डीबीटी मार्फत शेतकर्यांच्या खात्यावर शासन जमा करणार आहे. सभासदांनी वसुलीसाठी सहकार्य करावे.

मागील सहा वर्षात ठेवीत १४३.४७ कोटींची वाढ झाली असून, मार्च २०२२ पेक्षा मार्च २०२३ अखेर ठेवीत ११.७६ कोटीची वाढ झाली आहे. यावर्षी सुध्दा यापेक्षा जास्त ठेवीची अपेक्षा सर्व सहकारी संस्थांकडून व्यक्त करण्यात आली. ठेवीवर दि.१ सप्टेंबर २०२३ पासून आकर्षक स्पर्धात्मक व सुधारीत व्याजदर लागू केले आहे. माजीमंत्री आ. अमरिशभाई पटेल यांचे नियोजन व नेतृत्वाखाली शिरपूर सहकारी साखर कारखाना व जिल्हा बँक यांची संयुक्त समितीने कारखाना भाडेतत्वाने देण्याचे निश्चित केले आहे. भाडे करारनाम्याचे काम अंतिम स्वरूपात आले आहे. त्यामुळे सर्व शेतकर्यांसाठी आपल्या हक्काचा कारखाना लवकरच सुरू होणार आहे. त्यातून सर्व शेतकर्यांचे हित साधले जाईल. शिरपूर कारखाना संचालक मंडळ व बँक संचालक मंडळ या कामासाठी सतत प्रयत्नशील आहे. प्राधान्याने हे काम केले जात आहे. तसेच जिल्हा बँक सर्व प्रकारचे एनपीएची कर्जे वसूल करून बँक अ वर्ग मिळविण्याचा प्रयत्न करीत असल्याचेही सभेत सांगण्यात आले.

शहरातील राजेंद्र सुरी नगरात दुचाकी चोरणारे चोरटे गजाआड

धुळे । प्रतिनिधी

शहरातील राजेंद्र सुरी नगरात दि. २६ सप्टेंबर रोजी चोरट्यांनी अंगणात लावलेली दुचाकी लंपास केली. यासंदर्भात चाळीसगावरोड पोलीस ठाण्यात दि.२७ सप्टेंबर रोजी संबंधिताने गुन्हा दाखल केला.

अतुल सुरेश दहिते, रा.प्लॉट नं.६५, राजेंद्र सुरी नगर यांची दि. २६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ४.३० या वेळेत एम.एच.१८/ए. एल.७९६४ क्रमांकाची महिंद्रा पॅन्ट्रो कंपीनीची दुचाकी चोरट्यांनी संधी साधून लंपास केली. याप्रकरणी अतुल दहिते यांनी चाळीसगावरोड पोलीस ठाणे गाठत फिर्याद दाखल केली. पथकाने ऐंशी फुटी रोडवरील नटराज टॉकीज परिसरातील मारूती मंदिराजवळ दुचाकीसह उभ्या असलेल्या वरील दोघांना ताब्यात घेतले. अधिक चौकशीत वरील दोघा चोरट्यांनी दुचाकी राजेंद्र सुरी नगरातून चोरल्याची कबुलीही दिली. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे एलसीबीचे निरिक्षक हेमंत पाटील, पोसई बाळासहोब सूर्यवंशी, असई संजय पाटील, दिलीप खोंडे, धनंज मोरे, पोहेकॉ संदीप सरग, हेमंत बोरसे, संतोष हिरे, संदीप पाटील, तुषार सूर्यवंशी या पथकाने केली.

लढाईला तोंड फुटले

लोकसभेच्या निवडणुकांना अजून अवकाश आहे. मात्र, त्या आधी राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगण आणि मिझोराम या पाच राज्यांमधील विधानसभांच्या निवडणुका होणार आहेत. अनेकदा या दोन्ही निवडणुकांमधील मतदारांचा कौल वेगळा किंबहुना काहीवेळा परस्परविरोधी असू शकतो. तसे या आधी झालेही आहे. तरीही, देशातील राजकीय वाऱ्यांचा अंदाज येण्यासाठी या राज्यांच्या निवडणुका महत्त्वाच्या आहेत. 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीचे नेमके काय होणार, हे अद्याप माहीत नाही. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार अस्वस्थ असल्याच्या वावड्या आहेत. मात्र, नितीश यांचे वागणे अलीकडे इतके बेभरवशाचे झाले आहे की, वावड्या सत्यातही उतरू शकतात. महाराष्ट्रात प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला विरोधक बरोबर घेतात की नाही, हे समजायला तयार नाही. आंबेडकरांनी तर स्वबळावर सर्व ४८ जागा लढविण्याचा निर्धार बोलून दाखविला आहे. दक्षिणेत देवगौडा यांचा जनता दल-धर्मनिरपेक्ष हा पक्ष भाजपप्रणित एनडीएमध्ये येत असतानाच अण्णा द्रमुक एनडीएमधून बाहेर पडला आहे. तामिळनाडूतील प्रादेशिक वरचष्मा असणारे राजकारण राष्ट्रीय पक्षांना नेहेमीच त्रासदायक ठरत आले आहे. राजीव गांधी यांची तामिळनाडूत हत्या होण्याआधीपासूनचा हा सलग इतिहास आहे. तिकडे पंजाबात मात्र अकाली दलाने पुन्हा एकदा आपला जुना मित्र असणाऱ्या भारतीय जनता पक्षासोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे.

या साऱ्या राजकीय घडामोडी, आघाड्या, युती आणि पक्षांतरे यांना आता वेग येईल. काही धक्कादायक आणि अनपेक्षित घटनाही घडतील. अनेकदा एखाद्-दुसरी घटना किंवा घडामोड प्रचाराचा सारा रोखच बदलून टाकते. असे यापूर्वी घडले आहे. मात्र, असे असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेसचे सूर सापडलेले माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी मैदानात उतरण्याआधीचे हाकारे भरण्यास जोरदार सुरुवात केली आहे. या दोघांच्याही ताज्या भाषणांमधून भाजप आणि काँग्रेसचा रोख कसा असणार आहे, याची थोडी फार कल्पना येते. राहुल गांधी हे अलीकडे वारंवार देशातील ओबीसींच्या प्रश्नांवर भर देत आहेत. ओबीसी हा भारतीय जनता पक्षाचा सगळ्यांत मोठा आणि विश्वासार्ह असा जनाधार आहे. महाराष्ट्रात जसे 'माधव' (माळी, धनगर, वंजारी) हे समीकरण भाजपने ऐंशीच्या दशकात रूढ, लोकप्रिय केले; तसेच, देशभरात महत्त्वाच्या प्रबळ जातींपेक्षा इतर मागास वर्गाकडे भाजपने खास लक्ष दिले. त्यानंतरच्या टप्प्यात आदिवासी आणि भटक्या विमुक्तांकडेही भाजपने खास लक्ष दिले. हा जनाधार तोडण्यासाठी राहुल गांधी यांनी महिला आरक्षण विधेयकाच्या संदर्भातही ओबीसी आरक्षणाचा विषय उपस्थित केला होता. ओबीसींना विधिमंडळे किंवा संसदेत आरक्षण देण्याचा सध्या कोणताही प्रस्ताव नाही. मात्र, तो येवो अथवा न येवो; कधी ना कधी जनगणना करताना जातगणना करणे आवश्यक ठरणारच आहे. त्याशिवाय, महिला आरक्षणातील एससी, एसटी पोट-आरक्षणही नेमके होणार नाही. महिला आरक्षण प्रत्यक्षात येण्यास अवधी असला तरी त्याचा राजकीय लाभ कितपत होईल, याचा अंदाज भाजप घेत आहे. मात्र, त्याचवेळी भाजपच्या भात्यामध्ये आक्रमक राष्ट्रवादाच्या परिघातले अनेक विषय असतात. त्यातील एका बाणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हात घातला आहे. 'काँग्रेस पक्ष शहरी नक्षलवाद्यांच्या नादाला लागला आहे..' हा काही भाजपचा नवा आरोप नाही. तो राजधानीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील कन्हैया कुमार व इतरांच्या आंदोलनांपासून होत आला आहे. डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार असताना 'खरा कारभार सोनिया गांधी यांची सल्लागार परिषद करते आणि या परिषदेत 'अर्बन नक्सल' व्यक्तींचा वरचष्मा होता' असे आरोप या आधीही होत आले आहेत. काही काळापूर्वी काँग्रेस ही देशातील एनजीओ म्हणजे स्वयंसेवी संघटनांसारखी काम करते, असे म्हटले जाई. आता मोदी यांनी काँग्रेसचे तळागाळात मुरलेले, गावगाड्याशी नाते असणारे सारे नेते मागे पडले आहेत आणि कायमचे मौनात गेले आहेत, अशी तोफ डागली आहे. भाजपमधील किती तळागाळातील नेते स्वतंत्रपणे बोलण्याची हिंमत बाळगून आहेत, असा प्रश्न त्यांना कुणीतरी उद्या विचारेलच. मात्र, आजची काँग्रेस ही जुनी स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास असणारी काँग्रेस नाही, तो आता गंभीर राजकारण करणारा पक्षच उरला नसून भरकटला आहे, असे मोदी सूचित करत आहेत. इतकेच नव्हे तर 'राष्ट्रवादी भाजप' विरुद्ध 'देशद्रोह्यांशी संगनमत करणारा काँग्रेस पक्ष' असे समीकरण मतदारांच्या मनात ठसविण्याचा मोदींचा रोख आहे. त्यांनी दिलेला हा सिग्नल एव्हाना खालपर्यंत सगळ्यांनी पकडलाही असेल.

तीन कोटीची खडी फौज

भारतात दरवर्षी पंधरा लाख इंजिनियर्स पदवीधर होतात. सध्या भारतात अडीच कोटी इंजिनिअरिंग ग्रॅज्युएट नोकरी किंवा व्यवसायात कार्यरत आहेत तर जगभर ५० लाख भारतीय इंजिनियर वेगवेगळ्या देशात विविध पदांवर कार्यरत आहेत.

कोविड काळात जगभर बऱ्याच ठिकाणी काम बंद असताना भारतात मात्र ७२ लाख लोकांना सॉफ्टवेअर क्षेत्रात रोजगार मिळाला. मागील वर्षी सौदी अरेबियाने २१५ बिलियन डॉलर ऑइल एक्सपोर्ट केले होते तर आपण २२५ बिलियन डॉलर सॉफ्टवेअर एक्सपोर्ट केले होते. यावरून या क्षेत्रातील भारतीयांच्या कामगिरीचा अंदाज यावा .यावर्षी भारतीय सॉफ्टवेअर एक्सपोर्ट ३०० बिलियन डॉलरचा टप्पा पार करेल असा अंदाज आहे.

स्वातंत्र्यानंतर जेवढे आपण महामार्ग तयार केले तेवढेच महामार्ग गेल्या पंधरा वर्षात तयार झाले आहेत व पुढील दहा वर्षात पुन्हा ते दुप्पट होणार आहेत. यावरून सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रात भारतात उपलब्ध असलेल्या संधीचा अंदाज यावा. भारतातील नागरी वस्ती दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे बांधकाम क्षेत्रात प्रचंड मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. ✻पुणे, मुंबई, दिल्ली व बंगलोर यातील भारतातील अर्बन बेल्ट मध्ये एकूण लोकसंख्येच्या २० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या आता शहरात एकवटली आहे. यावरून जलद गतीने होणाऱ्या नागरीकरणाचा अंदाज यावा.✻ सांडपाणी प्रक्रिया, पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी, औद्योगिक आस्थापनांसाठी लागणारे पाणी यासंबंधीच्या प्रकल्पांना फार मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. पाण्याच्या पुनर्वापर क्षेत्रातील प्रकल्पांना फार मोठ्या प्रमाणावर मागणी आली आहे.

अपारंपरिक ऊर्जा निर्मिती क्षेत्रात गेल्या पंधरा वर्षात दहा पटीने वाढ झालेली आहे .सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या दोन्ही क्षेत्रात प्रचंड वेगाने काम सुरू आहे. ✻दिवसाच्या विजेच्या संपूर्ण भारतातील वापरा इतकी सौर ऊर्जा येत्या २५ वर्षात आपण तयार करू, इतके मोठे काम या क्षेत्रात सुरू आहे.✻

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात वाढीची गती कमी असली तरी याही क्षेत्रात युरोपियन व अमेरिकन देश भारतात फार मोठी इन्व्हेस्टमेंट करत असल्यामुळे ✻प्रत्येक वर्षी भारतातील मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्र प्रचंड वेगाने विस्तारात आहे.

आपण जगात कोणत्याही देशात कोणत्याही मॉलमध्ये गेलात तर आपल्याला मॉलमध्ये बांगला देशात तयार झालेले कपडे दिसतात. कारण प्रचंड लोकसंख्येमुळे बांगला देशात रोजगाराचा अभाव आहे. याच संधीला हेरून जगभरच्या कंपन्या बांगलादेशात कपडे तयार करून घेतात व त्याची जगभर निर्यात करतात.

भारतीय लोकसंख्या आपले आता बलस्थान झालेले आहे. भारतातील उपलब्ध मनुष्यबळामुळे जगभरचे काम भारतात येत आहे .अमेरिकेत ज्या कामाला एक कोटी रुपये मजुरी द्यावी लागते तेच काम करतात फक्त दहा लाख रुपयांत होते. त्यामुळे जगभरचे सर्वच विकसित देशांचे काम भारतीय सॉफ्टवेअर इंडस्ट्रीला मिळते आहे. हेच याच्यापुढे मॅन्युफॅक्चरिंग सेक्टर व इतर क्षेत्रांमध्ये सुद्धा होणार आहे.

भारतात सायन्समध्ये पदवीधर होणाऱ्यांपेक्षा इंजीनियरिंग क्षेत्रात पदवीधर होणाऱ्यांची संख्या मागील तीन वर्षापासून वाढली आहे. ✻बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ यासारखे भारताचे शेजारी देश प्रचंड मंदीचा सामना करत असताना औषध निर्माण क्षेत्र, इंजिनिअरिंग क्षेत्र, कृषी क्षेत्र या क्षेत्रात आपण केलेल्या कामगिरीमुळे कोविडकाळात आपल्या अर्थव्यवस्थेला बरीच मदत झाली. तसेच या क्षेत्रात वरील नमूद केल्याप्रमाणे खूप मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती झाली.

शब्द संवाद
प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

इंजिनिअरिंग शिक्षण क्षेत्रात दर्जाचे महत्व सर्वांनाच कळाल्यामुळे एआयसीटीने पुढील वर्षापर्यंत शंभर टक्के कॉलेजला एनबीए करून घ्यायला सांगितले आहे. बऱ्याचशा कॉलेजचे एनबीए आधीच झाले आहे. इंजीनियरिंग ग्रॅज्युएट्सला काळानुरूप औद्योगिक संस्थांना अपेक्षित स्तर गाठण्याकरता फार मोठे प्रयत्न करावे लागणार आहेत. मागील वर्षी ✻नऊ लाख✻ भारतीय विद्यार्थी जगभर शिक्षणासाठी विविध विद्यापीठात गेले. पुढील दोन वर्षात यांची संख्या ✻पंधरा लाखावर✻ जाणार आहे. ✻जगभरातील सर्वोत्तम विद्यापीठात भारतीय विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे .यातील ४०% विद्यार्थी इंजिनियरिंग पदवीधर आहेत.✻ जगभरच्या सर्वोत्तम कंपन्यांच्या प्रमुख पदावरही भारतीय कार्यरत आहेत. भारताचे चांद्रयान मोहीम यशस्वी झाली तेव्हा वॉशिंग्टन पोस्टने गमतीने लिहिले होते की, भारतातील सर्वोत्तम संस्थातून इंजिनिअरिंग पदवीधर गुगल, फेसबुक येथे काम करतात तर इतर भारतातील इंजिनिअर चंद्रावर चांद्रयान पाठवतात.

सध्या कार्यरत भारतातील तीन कोटी इंजिनियर्सची संख्या येत्या वीस वर्षात ✻पाच कोटी✻ वर जाईल असा अंदाज आहे. जगभरच्या इंजिनिअरिंग क्षेत्रातील सर्व संधींचा लाभ हे इंजिनियर घेतील. ✻इंजिनिअरिंग शिक्षणातील दर्जा, बदलत्या तंत्रज्ञानाशी सतत जुळून घेण्याची मानसिकता ,काळानुरूप औद्योगिक संस्थांच्या आवश्यकतेनुसार ✻अभ्यासक्रमातील बदल ,जगातील सर्वोत्तम विद्यापीठातशी स्पर्धा करणारे भारतीय शिक्षण, ही आव्हाने आपल्यासमोर असतील. परंतु लॉजिकल थिंकिंग हा इंजीनियरिंग अभ्यासक्रमाचा मुख्य पाया असल्याने, समस्या अनेक असल्या तरी इंजिनिअरिंग क्षेत्रातील कार्यरत लॉजिकल थिंकर्स यातून नक्कीच मार्ग काढतील यात काही शंका नाही.

हरितक्रांतीचा जनक : स्वामिनाथन...

आयातदार देशाची प्रतिमा बदलून अन्नधान्याच्या बाबतीत भारताला स्वयंपूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महत्त्वाच्या धुरिणांपैकी एक प्रमुख नाव म्हणजे स्वामीनाथन. त्यांच्या प्रयत्नांमुळे १९६०च्या दशकात हरितक्रांती यशस्वी झाली, म्हणूनच त्यांना हरितक्रांतीचे जनक मानले जाते. शेतीत हरितक्रांती करणाऱ्या स्वामीनाथन यांचे गणेश विसर्जनाच्या दिवशीच निधन झाले. त्यांच्या कार्याचा आवाका समजून घेण्याचा प्रयत्न आपण करायला हवा.

कृषिप्रधान देश असल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे. अजूनही ५९ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतीला प्राधान्यक्षेत्राचा दर्जा असला, तरी त्याच्याकडे सर्वाधिक दुर्लक्ष होते. शेतीसंबंधी अनेक धोरणे आखण्यात आली, तरीही निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात शाश्वत उत्पन्नाचा कोणताही मार्ग अजून तरी सापडलेला नाही. भारतातील लोकांची अन्नधान्याची गरज भागवण्यासाठी परदेशातून आयात करावी लागत होती. मिलो गव्हावर भारताची गरज भागवली जात होती. आयातदार देश अशी भारताची असलेली प्रतिमा बदलण्यामागे स्वामीनाथन यांचा हात होता.

स्वामीनाथन यांच्या कुटुंबात संशोधनाचा वारसा आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवर मोठा अहवाल दिला होता. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याची शिफारस केली होती. ही शिफारस अमलात आणण्याची आश्वासने राजकीय पक्षांनी जाहीरनाम्यात दिली. त्यावर निवडणुका जिंकल्या. सत्तेवर आल्यानंतर मात्र ग्राहकहीत लक्षात घेऊन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले. सर्वोच्च न्यायालयात स्वामीनाथन समितीच्या शिफारशी लागू करता येणार नाहीत, असा अहवाल दिला. शेतकऱ्यांच्या जीवनात सुगीचे दिवस आणण्यासाठी अहर्निश झटणाऱ्या स्वामीनाथन यांची ओळख जागतिक कीर्तीते महान कृषी शास्त्रज्ञ म्हणून केली जात होती. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा आणि लोकांना सशक्त करण्याचा सर्वात मोठा आणि प्रभावी मार्ग म्हणजे शेतकऱ्यांचे उत्पादन चांगले आणि जास्तीत जास्त असेल याची खात्री करणे. त्यामुळे देशातील शेतकरी समृद्ध होऊन अर्थव्यवस्थेत आपली भूमिका बजावू शकतील. भारताच्या अर्थव्यवस्थेला संकटाच्या काळात कायम शेती क्षेत्राने आधार दिला; परंतु शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या आश्वासनांचा सत्ताधाऱ्यांना विसर पडला. शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र क्रांती करणारे स्वामीनाथन यांनी वैद्यकीय क्षेत्रात अभ्यास सुरू केला; पण नंतर त्यांची शेतीमध्ये आवड निर्माण झाली. स्वामीनाथन एकदा म्हणाले होते, की 'अशक्य' हा शब्द प्रामुख्याने आपल्या मनात असतो आणि आवश्यक इच्छाशक्ती आणि परिश्रम दिल्यास महान कार्ये पूर्ण करता येतात. त्याचा सरळ अर्थ असा होतो की, 'अशक्य' काहीही नसते. इच्छाशक्ती आणि प्रयत्नांच्या जोरावर अशक्य ते शक्य करता येते.

स्वातंत्र्यानंतर १८ वर्षांनी, धान्य उत्पादनात लक्षणीय घट होत होती आणि दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होऊ लागली होती. अशा परिस्थितीत भारतासारख्या विशाल देशाला केवळ दुष्काळापासून वाचवायचे नव्हते, तर अर्थव्यवस्थेला चालना द्यायची होती, अशा परिस्थितीत स्वामीनाथन यांनी प्रतिकूल परिस्थितीतही भारताला या समस्येतून वाचवले होते. त्यांनी गव्हाचे उत्कृष्ट उत्पादन देणारे वाण विकसित केले. त्यामुळे शाश्वत विकासाला चालना मिळाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही शेतकऱ्यांना कोणीही शिक्षित केले नाही. त्यामुळे दुष्काळासारखे प्रश्न निर्माण होऊ लागले. कृषीप्रधान देशात शतकानुशतके पिकांच्या वाढीसाठी उपकरणे आणि बियाण्यांमध्ये सुधारणा झाली नव्हती. स्वामिनाथन हे पहिले व्यक्ती होते, ज्यांनी गव्हाचे उत्कृष्ट वाण ओळखले आणि शेतकऱ्यांना त्याची जाणीव करून दिली. त्यांना शेतकऱ्यांचा मसिहा म्हटले जाते. १९६० च्या दशकात भारत मोठ्या प्रमाणात दुष्काळाच्या उंबरठ्यावर होता. त्या वेळी स्वामीनाथन यांनी नॉर्मन बोरलॉग आणि इतर शास्त्रज्ञांसोबत गव्हाचे एचवायव्ही बियाणे विकसित केले. १९४३ मधील बंगालचा दुष्काळ आणि देशातील अन्नटंचाई अनुभवल्यानंतर स्वामीनाथन यांनी कृषी क्षेत्रात उतरण्याचा निर्णय घेतला होता. बटाटा, तांदूळ, गहू, ताग इत्यादींवरील संशोधनाचे श्रेय त्यांना जाते. त्यांनी भारतीय कृषी संशोधन परिषद आणि आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेचे महासंचालक म्हणून काम केले. १९७९ मध्ये ते कृषी मंत्रालयाचे प्रधान सचिव होते. १९८८ मध्ये स्वामिनाथन हे निसर्ग आणि नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय संघाचे अध्यक्ष झाले. १९९९ मध्ये टाईम मासिकाने त्यांचा विसाव्या शतकातील सर्वात प्रभावशाली आशियाई लोकांच्या यादीत समावेश केला होता. आपले भविष्य सुधारण्यासाठी उच्च दर्जाच्या वाणांसह शेती करणे किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी भारताच्या कायाकल्पाचा नवा अध्याय लढून नव्हे, तर शांतपणे प्रत्येक बीज रोवून लिहिला. त्यांनी गरीब शेतकऱ्यांच्या शेतात झाडे लावण्यासाठी प्रोत्साहन दिले आणि त्यांना स्वावलंबनाचा मार्ग दाखवला. हरितक्रांती प्रकल्पाद्वारे त्यांनी भारतातील कृषी क्षेत्रामध्ये बदल घडवून आणला आणि संपूर्ण देशात त्याचा विस्तार केला. त्यांच्या योगदानामुळे त्यांनी अवघ्या २५ वर्षांत भारतीय शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात स्वावलंबी बनवले आणि हरितक्रांतीचे मुख्य प्रेरणास्थान बनले. भारतीय कृषी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल स्वामिनाथन यांना अनेक सन्मान मिळाले. त्यांच्या या अनोख्या प्रयत्नांसाठी त्यांना सन्मानित करण्यात आले आणि त्यांच्या अहोरात्र मेहनतीतून त्यांनी भारतीय शेतीला नवी दिशा दिली.

स्वामिनाथन यांनी त्यांना निधीचा चांगला उपयोग केला आणि १९९० मध्ये चेन्नई येथे 'स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन'ची स्थापना केली. त्यांनी कृषी संशोधन क्षेत्रात नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या प्रेरणेने मोठे प्रकल्प पुढे नेले. त्यांच्या समर्पित योगदानामुळे त्यांनी भारतीय कृषी क्षेत्रात विकासाचे नवे मापदंड प्रस्थापित केले आणि देशाची अन्न सुरक्षा मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जबलपूरमधील जवाहरलाल नेहरू कृषी विद्यापीठ हे भारतातील सर्वोत्तम कृषी केंद्रांपैकी एक आहे, हे देखील त्यांच्या प्रयत्नांचे फलित मानले जाऊ शकते. त्यांच्या धोरणामुळे भारताने अन्नधान्याच्या तीव्र टंचाईतून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल केली. तांदूळ आणि गव्हाच्या उच्च-उत्पादक वाणांच्या शोधात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली. स्वामीनाथन यांच्या सांगण्यावरून भारत सरकारने बोरलॉग यांना भारतभेटीचे निमंत्रण दिले. गहू पिकवणाऱ्या काही राज्यांना भेटी दिल्यानंतर त्यांनी मेक्सिकन जातींचे शंभर किलो बियाणे भारताला दिले. काही चाचणीनंतर या बियांची प्रथम दिल्लीत पेरणी करण्यात आली आणि उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले. पूर्वी हेक्टरी एक ते दीड टनऐवजी आता हेक्टरी चार ते साडेचार टन गहू उत्पादन घ्यायला सुरुवात झाली आहे. भारतात १९६५-६६ आणि १९६६-६७ अशी सलग दोन वर्षे दुष्काळ पडला होता. धान्याचे उत्पादन घटले आणि भारताला अमेरिकेतून आयातीवर अवलंबून राहावे लागले.

स्वामीनाथन यांचे प्रयत्न या काळात भारतासाठी उपयुक्त ठरले आणि त्यांच्या देखरेखीखाली उच्च उत्पन्न देणाऱ्या जाती संशोधन करण्यात आले. त्यामुळे भारतातील धान्याचे उत्पादन वाढले आणि भारत धान्य संकटातून बाहेर आला. भारताच्या हरितक्रांतीच्या मागे इतरही लोक होते; पण तज्ज्ञांच्या मते स्वामीनाथन यांची भूमिका केंद्रस्थानी होती. देशाच्या इतिहासातील संकटाच्या काळात स्वामीनाथन यांच्या कृषी क्षेत्रातील कार्यामुळे कोट्यवधी लोकांचे जीवन बदलले आणि देशासाठी अन्न सुरक्षा सुनिश्चित केली. २००४ मध्ये, भारतातील शेतकरी आत्महत्यांच्या वाढत्या घटनांदरम्यान, कृषी क्षेत्र सुधारण्यासाठी राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना करण्यात आली. त्याचे अध्यक्ष स्वामीनाथन होते. या आयोगाने किमान आधारभूत किमतीचा दिलेला फॉर्म्युला स्वामिनाथन फॉर्म्युला या नावाने प्रसिद्ध आहे. या अंतर्गत आयोगाने पिकावरील किमान हमी भाव त्याच्या पिकाच्या सरासरी किमतीपेक्षा किमान ५० टक्के जास्त असावा असे सुचवले होते. शेतकरी हिताच्या मार्गातील हा मैलाचा दगड मानला जातो; परंतु आजपर्यंत सरकारे या सूत्राची अंमलबजावणी करू शकलेली नाहीत. १९८७ मध्ये त्यांना कृषी क्षेत्रातील नोबेल पारितोषिक मानले जाणारे पहिले जागतिक अन्न पारितोषिक देण्यात आले. त्यांनी चेन्नई येथे एम. एस. स्वामीनाथन संशोधन संस्था स्थापन केली. ही संस्था कृषी क्षेत्रातील संशोधन कार्यात गुंतलेली आहे. स्वामीनाथन यांची कन्या आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी मुख्य शास्त्रज्ञ सौम्या स्वामीनाथन या संस्थेच्या अध्यक्ष आहेत. त्यांच्या अद्वितीय कामगिरीमुळेच त्यांनी जगात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

- प्रा. अशोक ढगे

शब्दकोडे-१९१

आडवे शब्द

१. सुरुवात, परिचय ३. एकरूपता ६. तुसडा ९. रासायनिक असल्यास जमिनीचा कस कमी करणारे १०. देवदासची प्रेयसी ११. पडणे १३. मार्ग १४. थोडक्यात साष्टांग नमस्कार विनंती विशेष १७. श्रीराम आणि पांडवांच्या वाट्याला आलेला समान भोग १९. जोंधळ्याचा दाणा २२. ऐटबाज २३. आरोळी २४. हत्ती २५. शिंपल्यातील प्राणी २६. नेहमी २७. नामशेष, उद्ध्वस्त २९. डाळिंब्या ३०. किरकोळ सामान ३३. फणसाचा एक प्रकार ३५. धैर्य ३७. कबूतर ३८. व्यायाम ४०. संधी ४१. सुंदर तरुणी ४२. शिर्डीचे संत ४५. भूपती ४६. गरा असलेले फळ ४७. मजल ४८. बभ्रा ५०. किंमत ५२. सापाची एक विषारी जात ५४. नवरा (ग्रा.) ५५. प्रेमिकांना घायाळ करणारा नेत्रकटाक्ष ५८. आईवडील ६१. चिखल ६२. धमनी ६३. जाडसर पीठ ६५. पंख ६६. चलनवलन ६९. अविरत साधना ७१. ब्राह्मण ७२. नऊ भावना ७४. सपाट ७६. रमापती ७८. घर ८०. रसाळ ८१. सर्वस्व ८२. उदर ८३. पाठवणी

उभे शब्द

१. पहाटवेळेचा प्रकाश, तेजस्वी आभा (हिंदी) २. सांभाळ, जपणूक ३. तलाव ४. पहारेकरी ५. ज्वर ६. मनुष्य ७. प्रश्नोत्तरे ८. आकार, मोठा बेत १२. सिद्धता १५. भव्य, अवाढव्य १६. विनंती १८. मनाला टोचणारे दुःख २०. शहाणा, सुंदर २१. संकट,पीडा २५. वेळ घालवणे २६. षष्ठीची देवता २८. दार २९. पातळ खांब ३०. आवेशाने पुढे जाणे ३१. रोखलेली नजर ३२. आवड ३४. गेरु ३६. सर्वांना सारखे (वाटप) ३९. मनोहर, रमणीय ४३. बगिचा ४४. चोख, उत्तम सोने ४५. सज्जनगडचे संत ४६. हुकूम ४७. बिनविषारी मोठा सर्प ४९. तुमचा चांगला छंद! ५१. कलावंत ५३. धोबी ५३. जुळे ५७. ढग (हिंदी) ५९. अटीची भाषा ६०. पाणी ६१. प्रधानमंत्री ६४. उत्तराधिकारी ६५. ठेवलेली नजर, दबा ६६. अधाशी, लालची ६७. एक पालेभाजी ६८. द्रव्य ७०. पसरलेले, उथळ ७३. व्रत ७५. गजऱ्यातील सुगंधी पाने ७७. क्रिकेटमधील धाव ७९. पुष्परस



शब्दकोडे १९० चे उत्तर

आडवे उत्तर

१.रहाटगाडगे ५. हद्दपार ७. अवसान ९. मटका १०.अवस ११. सत्याग्रह १२. वास १४.स्थानबद्ध १६. यथार्थ १८.राग १९.रखरखीत २२.दास २३. अमर २४. रबर २५.जबाबदारी २७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप ३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव ४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान ४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम ५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर ५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.काम काज ६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण ६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर ७५.अंगतपंगत

उभे उत्तर

१.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग ५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था ८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर १७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा २४.खटपट २५.जवळपास २६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ ३१.सम ाधान ३२.वरदान ३४.अटकळ ३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव ४५.दारवठा ४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस ४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन ५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात ६०.मोजदाद ६१.खसखस ६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर ७२.वात

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

अभाविपचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ उपकेंद्रात आंदोलन

नाशिक । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाच्या भोंगळ कारभार आणि वेळकाढू निर्णय क्षमतेविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे नाशिक उपकेंद्रात तीव्र आंदोलन करण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पासिंग क्रेडिट क्राईटेरियामध्ये इयर डाऊन झालेल्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षांच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात तात्पुरता प्रवेश देण्याचा निर्णय विद्यापीठाकडून घेण्यात आला होता. पण पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकामध्ये इयर डाऊन झालेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या पुढच्या वर्गातल्या तात्पुरत्या प्रवेशाचा उल्लेख नसल्याने महाविद्यालय व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेशाला अडचण येत आहे. तरी हा संभ्रम टाळण्यासाठी एक लेखी पत्रक काढून या बाबतीतला संभ्रम दूर करून विद्यापीठाने आपली भूमिका लवकरात-लवकर स्पष्ट करावी अशी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची मागणी केली.

त्याचबरोबर अनेक समस्यांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत असून विद्यार्थ्यांचे प्रश्नही लवकर सुटत नाही. नाशिकमध्ये अनेक महाविद्यालयाकडून विद्यापीठात विद्यार्थ्यांचे गुण पाठवणे राहून जातात. अशा वेळेस महाविद्यालय विद्यापीठावर आणि विद्यापीठ महाविद्यालयावर आरोप करण्यात व्यस्त राहतात. यामुळे यादरम्यान अनेक विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जात असल्याचा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केला आहे.

विद्यार्थ्यांचे निकाल लवकर लागत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढच्या सत्रासाठी प्रवेश घेता येत नाही. विद्यापीठांमध्ये लाच घेऊन विद्यार्थ्यांना गुणपत्रिका मिळतात आणि म्हणूनही सर्व परिस्थिती बघता विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठ वाऱ्यावर सोडले आहे का? असा प्रश्न पडतो.

ह्या वेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या शिष्टमंडळाने उपकेंद्र समाव्यक येंना निवेदन दिले आणि विद्यापीठाने त्यांची भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी केली. यावेळी अभाविप नाशिक महानगर मंत्री ओम मालुंजकर, महानगर सह मंत्री प्रगती काळे, राज चव्हाण, आर्यन भैसे, कुणाल कोरे, भावेश परदेशी, वैभव दराडे, जहिर पठाण, प्रदीप लोखंडे, मेघना जाधव व अभाविप कार्यकर्ते आणि विद्यार्थी उपस्थित होते.

गोदावरी स्वच्छतेसह विविध उपक्रमांचे आजपासून आयोजन

विविध संस्था, संघटनांच्या मिनी कुंभमध्ये आयएमएचाही सहभाग

नाशिक । प्रतिनिधी

स्वच्छतेचा जागर करतांना आज रविवार दि.१ ते मंगळवार दि.३ ऑक्टोबर या कालावधीत नाशिक व परिसरात स्वच्छता उपक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये गोदावरी पात्र स्वच्छतेसोबत शहरात स्वच्छता, जनजागृती, ब्रह्मगिरी भागातील कुंड पुनर्जिवित करण्यासह विविध उपक्रमांचा समावेश असेल, अशी माहिती अभिनेते चिन्मय उदगिरकर, आयएमए अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ, डॉ.आवेश पलोड आदींनी पत्रकार परीषदेत दिली.

नाशिक महापालिका, नमामी गोदा फाउंडेशन, सत्संग फाउंडेशन यांच्यासह विविध संस्था, संघटनांतर्फे होत असलेल्या या मिनी कुंभमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशनचा सहभाग राहाणार आहे. पत्रकार परीषदेस डॉ.वृषीनीत सौदागर, नाशिकरोड आयएमएच्या अध्यक्षा डॉ. स्वप्नांजली आव्हाड, डॉ.पंकज भट, भालचंद्र ठाकरे, डॉ.स्वप्नील खैरनार आदी उपस्थित होते.

अभिनेते चिन्मय उदगिरकर म्हणाले, तीन दिवसांच्या या उपक्रमांत १ ऑक्टोबरला स्वच्छता ही सेवा या अभिनव उपक्रमाअंतर्गत शहरभरात स्वच्छता मोहिम राबविली जाईल. २ ऑक्टोबरला सकाळी ७ वाजेपासून गोदावरी आईच्या स्वच्छतेची मोहिम सुरु होईल. आनंदवल्ली ते रामतीर्थ या भागामध्ये एकूण १० ठिकाणी मोहिम पार पडणार आहे. यावेळी जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंग तसेच सत्संग फाउंडेशनचे श्री. एम. यांची प्रमुख उपस्थिती राहाणार आहे. उडाण, शौर्य, उमंग, राजमुद्रा ग्रुप यांसह राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत विद्यार्थी उपस्थित राहातील. तसेच ३ ऑक्टोबरला ब्रह्मगिरी परिसरात कुंड पुनर्जिवित करण्याच्या उद्देशाने उपक्रम राबविला जाणार आहे.

मनपा घनकचरा विभागाचे संचालक डॉ.आवेश पलोड म्हणाले, महापालिका प्रशासनाच्या वतीने स्वच्छता ही सेवा याअंतर्गत व्यापक मोहिम राबविली जात आहे. नाशिककरांनी या मोहिमेत सहभागी व्हावे. तसेच नित्याने ओला व सुका कचरा विलगीकरण करतांना महापालिका प्रशासनाला सहकार्य करत शहर स्वच्छ ठेवण्यात हातभार लावावा. प्लॅस्टिक निर्बंधांबाबत प्रशासन कठोर भूमिकेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आयएमए अध्यक्ष डॉ.विशाल गुंजाळ म्हणाले, सामाजिक आरोग्य चांगले राहाण्यासाठी आरोग्य नेहमीच परीश्रम घेत असतात. परिसर स्वच्छ राहिल्यास आजारपण घटतील. या जाणीवेतून आयएमए या अभिनव उपक्रमाशी जोडले गेले आहे. मोहिमेदरम्यान संकल्प हॉस्पिटलमार्फत डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी उपस्थित राहाणार असून, शिबिरार्थींना आरोग्यसेवा पुरवतील.

डॉ.स्वप्नांजली आव्हाड म्हणाल्या, डॉक्टर थेट मैदानात उतरून स्वच्छता करणार असल्याचे याचा सकारात्मक संदेश समाजात जाणार आहे. यामाध्यमातून स्वच्छतेबाबत वातावरण निर्मिती होण्यास मदत होईल. डॉ.वृषीनीत सौदागर म्हणाले, नाशिककरांनी मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी व्हावे. तसेच मोहिमेत सहभागासोबत भविष्यातही स्वच्छतेचा आग्रह धरतांना सुदृढ समाज घडविण्यात योगदान द्यावे.

इंदिरानगर वासियांच्या सेवेसाठी मोफत वैकुंठ रथ, रुग्णवाहिका

सामाजिक कार्यकर्ते विनोद दळवी यांच्या स्वखर्चातून नागरिकांची सेवा

इंदिरानगर । प्रतिनिधी

आपण समाजाचे काही देणे लागतो 'मानव सेवा, हीच ईश्वर सेवा' हे ब्रीद वाक्य लक्षात घेत सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे विभागप्रमुख विनोद दळवी यांनी स्वखर्चातून नागरिकांच्या सेवेसाठी वैकुंठ रथ तसेच रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. इंदिरानगर राजीवनगर तसेच पाथर्डी वासियांना या वैकुंठ रथासह रुग्णवाहिकेची मोफत सेवा मिळणार असल्याने नागरिकांनी दळवी यांच्या सामाजिक कार्याबद्दल कौतुक केले आहे.

इंदिरानगर, राजीवनगर, पाथर्डी शिवार यासह नासर्डी ते पाथर्डी भागातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. भागात मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग देखील वास्तव्यास आहे. परिसरातील नागरिक आजारी पडल्यानंतर त्यांना काही मिनिटात रुग्णालयापर्यंत जाण्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी तसेच अंत्यसंस्कारासाठी मोफत वैकुंठ रथ उपलब्ध व्हावा हा सामाजिक हेतू मनात ठेवत परिसरातील सामाजिक कार्यकर्ते विनोद दळवी यांनी मोफत वैकुंठ रथ तसेच रुग्णवाहिका नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून दिली आहे. विनोद दळवी यांच्या मातोश्री आशा अरुण दळवी तसेच शोभा केशव पाटील यांच्या स्मरणार्थ बुधवारपासून नासर्डी ते पाथर्डी या परिसरात अंत्यसंस्कारासाठी वैकुंठ रथ सुरू करण्यात आला आहे. तसेच येत्या दोन ते तीन दिवसात रुग्णवाहिका देखील नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार असल्याचे दळवी यांनी सांगितले आहे.

सप्तशृंगी गडावर तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

नाशिक । येथे जळगाव जिल्ह्यातून हमाली कामासाठी आलेल्या एका तरुणाने नवीन बांधकाम ठिकाणी चौथ्या मजल्यावर दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. संतोष माधव भावसार (वय ४८) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. आज सकाळी सात वाजेच्या सुमारास घरमालक बापू कारगिल यांनी बांधकाम ठिकाणी पाणी मारण्यासाठी पाण्याची मोटर सुरु केली. त्यावेळी प्लास्टिकच्या पाईपमध्ये पाणी येत नसल्याने ते बांधकाम ठिकाणच्या चौथ्या मजल्यावर बघण्यासाठी गेले असता त्यांना मयत संतोष उर्फ (भंभ्या) भावसार दोरीच्या साह्याने तसेच पाण्याच्या पाईप नळीत गुंतल्याचे दिसून आले.

रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचा कार्यकर्ता मेळावा

नाशिक । प्रतिनिधी

रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्या वतीने श्री गोदावरी नदीबद्दल नागरिकांच्या मनात पूज्य श्रद्धाभाव प्रकट व्हावा म्हणून निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेत जवळपास ३००० हजार विद्यार्थ्यांकडून व नागरिकांकडून विक्रमी सहभाग नोंदविण्यात आला. या कार्यात जवळपास १५० कार्यकर्त्यांनी समाजामध्ये जावून नागरिक व विद्यार्थ्यांना गोदावरीची महती विशद केली. तर तितक्याच तळमळीने शिक्षक वर्गाने सहकार्य केले.

या कार्यक्रमास सेन्सॉर बोर्डाचे सदस्य विचारवंत, पत्रकार व पद्मश्री पुरस्कार प्राप्त रमेश पतंगे मार्गदर्शन करणार असून प्रा.रवि भुसारी हे अध्यक्ष म्हणून उपस्थित असतील. प्रगतीशील शेतकरी रा. स्व संघाचे विभाग संघचालक कैलास साळुंके हे उपस्थित राहणार आहे. इस्कॉन व आर्ट ऑफ लिव्हिंग या दोन्ही संघटनांनी या कार्यात भरीव योगदान केलेत. आज दि. १ आक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता शंकराचार्य न्यास सभागृह, गंगापूर रोड नासिक येथे नासिककर नागरिकांनी अवश्य उपस्थित राहावे असे आवाहन आ. प्रा. देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे व आ. राहूल ढिकले यांनी केले आहे.

ॲड.बी. बी. वाघमारे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.कि. अर्ज क्रं. ११६०/२०२३

गितांजली मंगेश हरळे (लोहार) वगैरे ..**अर्जदार**

।। विरुध्द ।।

निरंक ...**जाबदेणार**

कै.मंगेश केशव हरळे (लोहार) ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. दि. २७/९/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि. दि. अर्ज क्र.११६०/२०२३ चा अर्ज कै.मंगेश केशव हरळे (लोहार) यांचे कायदेशीर वारस आहेत अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे.न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी से. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.२/११/२०२३ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोर्ट नं. ४ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दि. २९/०९/ २०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे (शिक्का) **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे**

प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्सतर्फे डिसेंबरमध्ये मुंबईत आंतरराष्ट्रीय प्रदर्शन

१५०० हून अधिक उत्पादक सहभागी होणार

नाशिक । प्रतिनिधी

ऑल इंडिया प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनतर्फे प्लास्टिव्हिजन इंडिया २०२३ आंतरराष्ट्रीय प्रदर्शन ७ ते ११ डिसेंबरपर्यंत बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव (मुंबई) येथे आयोजित करण्यात आहे. उद्योग क्षेत्रातील विविध विभागांतील १५०० हून अधिक उत्पादक आपले स्टॉल्स लावणार असल्याची माहिती प्रदर्शनाचे महाराष्ट्राचे प्रमोशन अधिकारी रवी जशनाणी यांनी दिली.

जगातील टॉप ५ प्रदर्शनांपैकी एक गणले जाणारे असोसिएशनचे हे बारावे प्रदर्शन आहेत. त्याचे सर्व स्टॉल्स ६ महिन्यांपूर्वीच बुक झाले आहेत. ३० हून अधिक देशांतील उत्पादक सव्वा लाख चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या संपूर्ण परिसर व्यापलेल्या उत्तम सुविधायुक्त जागेत आपले स्टॉल्स लावणार आहेत. गोरेगाव येथील प्रदर्शनाला जगभरातून अडीच लाखाहून अधिक लोक भेट देतील. प्रदर्शनाचे ठिकाण मेट्रो, लोकल आणि वाहतुकीशी चांगले जोडले गेले असल्याने प्रशस्त पार्किंगची व्यवस्था असल्यामुळे येथे वाहतुकीचा कोणताही प्रश्न उद्भवणार नसल्याचे जशनाणी यांनी पुढे नमूद केले. युएफआय या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या सर्वोच्च सर्वोच्च संस्था आणि भारत सरकार द्वारे या प्रदर्शनाचा गौरव झालेला आहे. यावेळी एम एसएमएमई चेअरमन सिद्धार्थ शहा, व्यवस्थापन समिती सदस्य विनोद ओझा, प्मा कमिटी मेंबर चेतन जोशी, प्लास्टिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन नाशिकचे शंकर रामन अय्यर, शिवा अय्यर उपस्थित होते.

पाच दिवसीय प्रदर्शनात ३० हून अधिक देशांच्या उद्योजकांनी आपला सहभाग निश्चित केला आहे. ज्यात नवीन तंत्रज्ञान आणि थेट यंत्रसामग्री सुद्धा बघण्याची संधी लोकांना उपलब्ध होईल. प्रदर्शन काळात अनेक तांत्रिक परिषदा आणि बिटूबी बैठका होतील. ज्यात नवीन ट्रेंड आणि तंत्रज्ञानाचे सर्वांना ज्ञान उपलब्ध होईल .प्लास्टिव्हीजन २०२३ हे आणि एमएसएमई आणि स्टार्ट-अपसाठी जागतिक व्यवसाय विकसित करण्यासाठी उद्योजकांना एक चांगले व्यासपीठ आहे.

ॲड.पी. बी. सिसोदे, धुळे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं.११५२/२०२३

विजय नामदेव पाटील उ.व.-३५ वर्ष, धंदा-नोकरी
रा. नकाणे, ता. जि. धुळे. ...**अर्जदार**

आणि

मा. शाखाधिकारी सो, स्टेट बँक ऑफ इंडिया
कुमार नगर, धुळे, ता. जि. धुळे ... **सामनेवाला**
कै. मंगलबाई नामदेव पाटील (मयत) मृत्यु दि. ०६/०४/२०२३
मृत्यु ठिकाण : नकाणे, ता. जि. धुळे. ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. मंगलबाई नामदेव पाटील (मयत) यांचे नावे खालील नमुद रक्कमांचा तपशिल:-

अ.क्र. - १

तपशिल :- बँकेचे नाव : स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कुमार नगर, साक्री रोड, धुळे IFS Code: SBIN0061455 MICR : 424002007

खाते क्र. :- बचत खाते क्र. १०४१०७२१५४६

शिल्लक रक्कम:- खात्यात असलेली एकुण रक्कम रू. १२,४०,३७४.२२/- (अक्षरी रू. बारा लाख चाळीस हजार तीनशे चौऱ्याहत्तर रूपये बाविस पैसे मात्र) व त्यावरील आजतारखेपर्यंत व्याज

वरील रक्कमा व त्यावरील व्याजासह मिळावी म्हणुन सक्सेशन सर्टिफिकेट मिळावे म्हणुन दि. २५/९ /२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०९/११/२०२३ ही यांचे निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं.- न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक :-- २७/०९/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन **अधिक्षक**
मे. दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे (शिक्का) **मे. दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे**

ॲड.पी. बी. सिसोदे, धुळे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११५३/२०२३

१. श्री. भगवान शंकर गवळी उ.व.-५२ धंदा :- व्यवसाय
रा. प्लॉट नं. १५६, साईबाबा नगर, नकाणे रोड, देवपुर, धुळे, ता. जि. धुळे.
२. श्री. किसन शंकर गवळी उ.व.-४७ धंदा :- व्यवसाय,
रा. साईबाबा नगर, नकाणे रोड, देवपुर, धुळे, ता. जि. धुळे
३. विजय शंकर गवळी उ.व.-४४ धंदा :- व्यवसाय
रा. प्लॉट नं. ३६, साईबाबा नगर, नकाणे रोड, देवपुर, धुळे, ता. जि. धुळे
४. छायाबाई कैलास गवळी उ.व.-३८ धंदा :- घरकाम
रा. द्वारा : उमाजी गवळी, कामीदिप गॅस गोडाऊन, कैलास नगर, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक
५. माया दीपक गवळी उ.व.-३७ धंदा :- घरकाम
रा. रावेर रोड, चितोड, धुळे, ता. जि. धुळे ...**अर्जदार**

।। विरुध्द ।।

कोणीही नाही ... **सामनेवाला**

आणि

१. कै. शंकर पिराजी गवळी (मयत) मयत दि.११/१२/२००९
२. कै. लिलाबाई शंकर गवळी (मयत) मयत दि. ३०/११/२०२२
दोघांचे मृत्यु ठिकाण: धुळे, ता. जि. धुळे. ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. शंकर पिराजी गवळी (मयत) यांच्या नावे मौजे सोनेवाडी, ता. जि. धुळे येथे गाव नमुना ८ अनु. क्र. १४५, मालमत्ता क्रमांक १२६, त्यासी क्षेत्र ४० X ४० = १६०० चौ. फु. पडीत जागा अशी मिळकत असुन सदर मिळकतीवर अर्जदार नं. १ ते ५ यांचे नाव लावणेकामी तसा वारस दाखला मिळणेसाठी दि.२५/९/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०३/११/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. ६, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २७/९/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन **अधिक्षक**
मे.दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे (शिक्का) **मे. दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे**

ॲड. निखिलकुमार रविंद्र वडनेरे, धुळे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११६६/२०२३

श्रीमती. अरूणा नंदकिशोर भराडीया वै. ..**अर्जदार**

।। विरुध्द ।।

कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया (मयत) ...**मयत**

ज्याअर्थी की, अर्जदार नं. १ अरूणा नंदकिशोर भराडीया हया कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २. खुशबु अंकुर भक्कड हि कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांची मुलगी आहे. कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांचे दि. २०/४/२०२३ रोजी मौजे पुणे येथे निधन झालेले आहे. कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांचे आई.डी.बी.आई बॅक. लि. धुळे शाखा गल्ली नं. ६, धुळे येथे खाते कं./ अकाउंट आई. डी.- ४८३१०४००००३२४७ मध्ये दि.२७/०४/२०२३ रोजी पावेतो रक्कम रू. ६,०४,७४२.९७/- मात्र जमा आहेत. आणि आई.डी. बी. आई बॅक. लि. धुळे शाखा गल्ली नं. ६, धुळे येथे खाते कं. / अकाउंट आई.डी. - ०४८३१०४०००१२२४५० अन्वये खाते असुन त्यात दि.२४/०६/२०२३ रोजी पावेतो रक्कम रू. ७८३.०० /- मात्र जमा आहेत. सदर रक्कमा अर्जदार यांना मिळण्याकरीता अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरीता भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. १/११/२०२३ रोजी मे. कोर्टात चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक-२९/०९/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे (शिक्का) **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

न्यूज कॉलम

'पालेशा'त स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन

धुळे । धुळे एज्युकेशन सोसायटीच्या येथील मा. ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. परम करिअर अॅकॅडमी, नाशिकचे संचालक प्रशांत अहिरे यांच्या हस्ते कार्यक्रम झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रभाकर महादेव अध्यक्षस्थानी होते. श्री. अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपले ध्येय व उद्दिष्ट निश्चित असले पाहिजे. त्यादृष्टीने चिकाटीने प्रयत्न केले तर हमखास यश असते, असे ते म्हणाले.

किल्ले लळींग परिसरात स्वच्छता मोहीम

धुळे । महात्मा गांधी जयंती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळानिमित्त २ ऑक्टोंबर रोजी सकाळी लळींग किल्ल्याच्या परीसरात साफसफाई व स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार येणार आहे. अशी माहिती आर. सोनवणे यांनी एका पत्रकान्वये दिली आहे.

शिरपूर तालुक्यातील ६० वृद्ध कलावंतांना 'क' वर्ग प्रमाणे दरमहा २,२५० रुपये मंजूर

आ.अमरिशभाई पटेल, आ.काशिराम पावरा व भूपेशभाई पटेल यांच्या पाठपुराव्याला यश

शिरपूर । प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या पाठपुराव्यामुळे शिरपूर तालुक्यातील ६० वृद्ध कलावंतांना 'क' वर्ग प्रमाणे दरमहा २,२५० रुपये मंजूर झाले असून वृद्ध कलावंतांसह तालुक्यातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्याची योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड अध्यक्ष, राजश्री शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत यांच्या मार्फत करण्यात येते. यात 'क' वर्गातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना दरमहा २ हजार २५० रुपये मानधन तर 'ब' वर्गातील निवड झालेल्या लाभार्थ्यांना दरमहा २ हजार ७०० रुपये मानधन शासनामार्फत तहहयात कायमस्वरूपी देण्यात येते.

राज्य शासनाने नुकतेच शिरपूर तालुक्यातील वृद्ध कलावंतांसाठी वृद्ध कलावंत योजनेअंतर्गत दरमहा मानधन मंजूर केले आहे. शिरपूर तालुक्यातून ६० कलावंतांना मानधन मंजूर झाले असून लवकरच अजून अनेक वृद्ध कलावंतांना लाभ मिळणार आहे. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांनी या प्रकरणी लक्ष घालून सातत्याने पाठपुरावा केला. पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांचे या कामी सहकार्य लाभले.

भाईंच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर आमदार कार्यालयातील विकास योजना आपल्या दारी अभियान मार्फत सर्व स्वयंसेवक व भूपेशभाई फ्रेंडस सर्कलचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी शिरपूर तालुक्यात गावोगावी व संपूर्ण शहरात फिरून जनजागृती केली. तालुक्यातील वृद्ध कलावंतांकडून आवश्यक कागदपत्रे जमा करुन, त्याबाबत पूर्तता करून आमदार कार्यालयातील यंत्रणेमार्फत योग्य लाभार्थी कलावंतांचे प्रस्ताव तयार करून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या ६० कलावंतांना दरमहा तह्यात रुपये २,२५० दरमहा रक्कम मानधन स्वरूपात मिळणार असून ती रक्कम थेट बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे तालुक्यातील कलावंतांमध्ये चैतन्यमय व आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व लाभार्थ्यांनी आमदार कार्यालयामार्फत भाईंनी यंत्रणा राबविल्याने आभार मानले आहेत. लवकरच अजून काही कलावंतांचे प्रस्ताव शासनामार्फत मंजूर होऊन त्यांनाही लाभ मिळणार असल्याचे समजते. माणसाच्या अंगी असंख्य कला असतात ज्यांची व्याख्या करणे शक्य नाही. कला अविष्काराची असंख्य अंगे असून कला हा सुप्तगुण असून ते एक बौद्धिक वैभव देखील आहे. म्हणून शासनामार्फत अशा असंख्य कलावंतांना मानधनाच्या स्वरूपात आर्थिक भेट देऊन गौरवित येत असल्याने कलावंतांनी आनंद व्यक्त केला आहे.

इंद्रायणी फाउंडेशनतर्फे भव्य रक्तदान शिबिर संपन्न

धुळे । प्रतिनिधी

दोंदवाड येथील इंद्रायणी फाउंडेशनच्या वतीने, धुळे येथील अशोक नगरमध्ये भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले. यात इच्छापूरतेश्वर सार्वजनीक गणेश मित्र मंडळाच्या सभासदांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. यावेळी सहभागी रक्तदात्यांचा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन इंद्रायणी फाउंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला.

धुळे येथील अशोक नगरस्थित, इच्छापूरतेश्वर सार्वजनीक गणेश मित्र मंडळाच्या गणेशोत्सवस्थळी झालेल्या या रक्तदान शिबीर प्रसंगी इंद्रायणी फाउंडेशन अध्यक्ष रविबाबा माळी, मंडळाचे प्रतिनिधी दिपक राऊत, निखिल हरळ, प्रथमेश पाटील, भूषण हरळ, मिलिंद उगलमुगले, मंगेश राऊत, मनीष परदेशी, किरण हरळ, सोहम साळवी, संदीप पवार, सर्वेश विसपुते, हिमांशू राजपूत, पराग राजपूत, निलेश हरळ, आनंद हरळ, ओमकार गिराम आदी उपस्थित होते. यावेळी इंद्रायणी फाउंडेशन व इच्छापूरतेश्वर मंडळाच्या पदाधिकार्यानी रक्तदान केले. इंद्रायणी फाउंडेशन अध्यक्ष रवि माळी यांच्या हस्ते रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला. सामाजिक उपक्रमांनी गणेशोत्सव साजरा केल्याबद्दल व्दही संघटनांचे कौतुक होत आहे.

'ओबीसींची फरफट- मंडल आयोग आणि महिलांचे आरक्षण' विषयावर चर्चासत्र

सिडको । प्रतिनिधी

भारतीय संविधानाच्या कलम ३४० अन्वये भारतातील मागासलेल्या जातींना आरक्षण देण्यात आले. मात्र ५२ टक्के असलेल्या ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण देऊन त्यातही क्रिमिलियरची अट टाकून अप्रत्यक्षरीत्या आरक्षणाच्या हक्कापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. मंडल आयोगाने ज्या शिफारसी शासनाला केल्या होत्या त्यापैकी दोनच टक्के शिफारसी लागू करण्यात आल्या असून ९८ टक्के शिफारसी आजही प्रलंबित आहेत. ओबीसींना आजही आरक्षणाच्या माध्यमातून वंचित ठेवण्याचा प्रयत्न प्रत्येक सरकारने अप्रत्यक्षरीत्या केलेला दिसत आहे, याकरिता ओबीसी बांधवांना आरक्षणाच्या बाबतीत जागृत करून त्यांच्या न्याय हक्कासाठी संविधानात केलेल्या तरतुदी त्यांच्यापर्यंत पोहोचवून सरकारला उर्वरित मागण्या मान्य करण्याच्या हेतूने नाशिकमध्ये संविधान प्रेमी नाशिककर या संघटनेच्या माध्यमातून जागृतीपर परिषदेचे आयोजन करण्याचा निर्णय चर्चासत्रामध्ये घेण्यात आला.

सिडको येथील मानव सेवा केंद्रामध्ये ओबीसी वर्गातील प्रमुख प्रतिनिधींची एक बैठक 'ओबीसींची फरफट मंडल आयोग आणि महिलांचे आरक्षण' या विषयावर घेण्यात आली होती. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी संविधान प्रेमी नाशिककरचे शहर समन्वय किरण मोहिते होते. तसेच प्रमुख मार्गदर्शक डॉ. अर्चना दोंडे या होत्या. आपल्या अध्यक्ष भाषणांमध्ये किरण मोहिते यांनी ओबीसींच्या आरक्षणाचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला. यावेळी ओबीसी समाजातील विविध प्रतिनिधींनी आपले मत व्यक्त करून नाशिकमध्ये ओबीसी हक्क परिषदेचे आयोजन करण्याचा निर्धार केला आहे. यावेळी बैठकीला मच्छिंद्र दंडे, ड. बिस्मिल्ला पिंजारी, कृष्णा शिंदे, फारूक बागवान, रघुनाथ पाटील, अब्बास पिंजारी, सीरीन अभंग, देवा वाघमारे, अब्बास पिंजारी, सलीम खान, दत्तू तुपे, ड.सय्यद कासिम, तनवीर खान तांबोळी, ज्ञानेश्वर शिंदे, रघुनाथ जाधव, प्रभाकर शिलावट, देवेंद्र नाईक, जी.एस. ठेंगोडे, जहूर अत्तार आदींसह ओबीसी समाजातील विविध प्रतिनिधी उपस्थित होते. परिषदेच्या आयोजनासाठी नाशिक शहर पातळीवर येत्या ७ ऑक्टोबरला बैठकीचे आयोजन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

पै.शाहू दीपक सांगळेन कुस्ती स्पर्धेत पटविले रौप्य पदक

धुळे । कोल्हापूर येथे दि.२५ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात शाहू दीपक सांगळे याने रौप्य पदक पटकविले. यानिमित्त आज सायंकाळी सात वाजता शहरातील खंडेराव महाराज मंदिरापासून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. शाहू दीपक सांगळे याने इतक्या कमी वयात मिळविलेल्या या यशाबद्दल वडिल पै.दीपक सांगळे यांचेसह शिक्षक वृंद, मित्रपरिवार, तसेच अंबरदास रामदास विजय व्यायाम शाळेच्या मल्लांनी अभिनंदन केले आहे. या निमित्त शहरातील खंडेराव महाराज मंदिरापासून दि.१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजता विजय मिरवणुक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत पैलवान मंडळींसह हितचिंतक, मित्र परिवाराने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

नाशिक जिल्हा प्रगतिशील साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी कॉम्रेड राजू देसले

नाशिक । प्रतिनिधी

येत्या दि. ८ ऑक्टोबर रोजी नाशिक येथे तिसरे प्रगतिशील साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ९० वर्षाच्या प्रदीर्घ इतिहास असणाऱ्या प्रगतिशील लेखक संघाच्या नाशिक शाखा आणि इप्टा परीवार नाशिक यांच्या संयुक्त वतीने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कादंबरीकार तुकाराम चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी कॉम्रेड राजू देसले यांची निवड सर्वानुमते करण्यात आली आहे.

देसले हे विद्यार्थी दशेपासून ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन या विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून सामाजिक राजकीय चळवळीत सक्रिय आहेत. पतसंस्थेच्या कलेक्शन एजंटपासून भांड्यांच्या व्यवसाय ते पत्रकारितेचे प्राध्यापक अशी लहान मोठी नोकरी, व्यवसाय करून नाशिक मधील एचपीटी कॉलेजमधून बीए आणि एमएचे शिक्षण घेतले. मराठी हा विषय असल्यामुळे त्यांचा साहित्यशी जवळून संबंध आला आहे. लोक वांग्मय प्रकाशन संस्थेचे संचालक सदस्य म्हणून ते काम पाहतात. जातीअंताचा महत्त्वाचा कार्यक्रम म्हणून आंतरजातीय विवाह झाले पाहिजे या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मताप्रमाणे कृतिशील कार्य करत त्यांनी डॉ. सुवर्णा देसले यांच्याशी आंतरजातीय विवाह केला आहे. समृद्धी महामार्गामध्ये शेतकऱ्यांच्या गेलेल्या जमिनींच्या मोबदल्यासाठी मोठं आंदोलनाचे नेतृत्व केले. सरकारशी झुंज करून यशस्वीरीत्या मोबदला मिळवून दिला. छत्रपती शाहू महाराज स्मृतीशताब्दी वर्ष समिती नाशिकचे निमंत्रक वर्षभर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून शाहू महाराजांच्या विचारांचा प्रचार प्रसार केला आहे. सीएए, एनआरसी विरोधात स्थापन झालेल्या संविधान प्रेमी नाशिककर संघटनेचे संस्थापक निमंत्रक म्हणून त्यांनी काम पाहिले. आशा गटप्रवर्तक संघटनेच्या दीर्घकालीन लढ्याचे नेतृत्व ते करत आहेत. भारतीय कमयुनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव तसेच अखिल भारतीय किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष, आयटक कामगार संघटनेचे राज्य सचिव व राष्ट्रीय कौन्सिल सदस्य आहेत. छत्रपती पतसंस्थेचे ते संचालक आहेत. नाशिक येथे झालेल्या सतराव्या विद्रोही साहित्य संमेलन यशस्वी करण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी असल्यामुळे त्यांची प्रगतिशील लेखक संघाच्या या उपक्रमामध्ये महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. आठ ऑक्टोबर रोजी व्हीएन नाईक महाविद्यालयाच्या गोपीनाथ मुंडे सभागृहात होणाऱ्या या दिवसभराच्या संमेलनामध्ये उद्घाटन सत्र, दोन परिसंवाद, काव्य संमेलन डॉक्युमेंटरीचे प्रकाशन असे भरगच्च कार्यक्रम आहेत. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी प्रगतिशील लेखक संघाचे अध्यक्ष कवी प्रमोद अहिरे, जिल्हा सचिव प्रल्हाद पवार, कार्याध्यक्ष कवी अरुण घोडेराव, लता कांबळे, डॉ. शरद नागरे, डॉ. रामदास भोंग, निशांत गुरु, इप्टा चळवळीचे तल्हा शेख आधी प्रयत्नशील असून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा क्रीडा संकुलात शालेय योगासन स्पर्धा

धुळे । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत शालेय जिल्हास्तर ग्रामीण योगासन स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुलात झाली. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, महाराष्ट्र शारीरिक शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. आनंद पवार, धुळे शहर शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आर. बी. शिंदे, तालुका क्रीडा अधिकारी रेखा पाटील, योगासन स्पर्धेचे संयोजक टी. के. पाटील, मनीषा पवार, भूपेंद्र मालपुरे, अमित गोराणे, हिरामण चौरे आदी उपस्थित होते. जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. टिळे, डॉ. पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत सामोडे अनुदानित आश्रमशाळेचा संघ विजयी

सामोडे । प्रतिनिधी

आदिवासी विकास प्रकल्प धुळे अंतर्गत साक्री तालुक्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या तालुका स्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा शासकीय आश्रमशाळा शेवगे येथे संपन्न झाल्या.

या क्रीडा स्पर्धेत अनुदानित आश्रमशाळा सामोडे येथील विद्यार्थ्यांनी १९ वर्षीय मुले गटात कबड्डी व १९ वर्षीय खो-खो तर १४ वर्षीय मुले कबड्डी गटात संघ विजयी ठरले.तर वैयक्तिक खेळ प्रकारात १५ मुले व चार मुली असे मिळून एकूण ६६ विद्यार्थ्यांची प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धे करीता निवड झाली आहे.

या विजयी स्पर्धक खेळाडूंना क्रीडा शाळेतील मुख्याध्यापक पी.व्ही.जगताप, प्राचार्य झेड.एम.गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा प्रशिक्षक एम.डी.माळी, बी.आर.पारधी, जी.बी.पवार, एस.एम.मोहिते यांनी खेळाडूंचा सराव करून घेत. घवघवीत यश संपादन केले सदर स्पर्धे करीता शाळेतील प्रा.गणेश भावसार, प्रा.विजय ठाकरे, प्रा.प्रविण पगारे व शिक्षक शरद सुर्यवंशी यांचे सहकार्य लाभले या बद्दल महात्मा फुले विद्याप्रसारक संस्था पिंपळनेर संस्थेचे अध्यक्ष ॲड संभाजी पगारे, सचिव पुष्पलता पगारे, संचालक व्ही. एन.जिरेपाटील, विजयराव सोनवणे, विठ्ठलराव पगारे, स्वप्निल पगारे, छायाताई पगारे मिलिंद महाजन यांनी यशस्वी खेळाडू व क्रीडा प्रशिक्षक यांचे कौतुक व अभिनंदन केले.

एक तास स्वच्छता मोहिमेचे आयोजन

स्वच्छता अभियानात नागरिकांनी सहभागी व्हावे-अभिनव गोयल

धुळे । प्रतिनिधी

स्वच्छ भारत अभियानातंर्गत दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत स्वच्छता ही सेवा २०२३ पंधरवाडा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता नागरी आणि ग्रामीण भागात 'एक तारीख एक तास' हा स्वच्छता श्रमदान उपक्रम राबविण्यात येणार असून या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत स्वच्छता ही सेवा स्वच्छता पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. कचरा मुक्त भारत अशी या वर्षाची संकल्पना आहे. त्याचाच एक भाग म्हणून स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता 'एक तारीख एक तास' उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये १ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्ह्यातील सर्व नागरी तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रत्येक वॉर्ड, ग्रामपंचायतीमध्ये श्रमदानाद्वारे स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल. सदर उपक्रमात नागरिकांद्वारे प्रत्यक्ष स्वच्छता करण्यात येईल आणि स्वच्छता उपक्रमाचा दृश्य परिणाम दिसण्याच्या दृष्टीने श्रमदान करण्यात येणार आहे.

निमझरी येथे दोन दिवसीय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

शिरपूर । प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत शिरपूर तालुक्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २५ व २६ सप्टेंबर २०२३ रोजी निमझरी (ता. शिरपूर) येथील आश्रमशाळेत घेण्यात आल्या.

या दोन दिवसीय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन श्री बालाजी संस्थान उपाध्यक्ष गोपाल भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धुळे येथील सहा. प्रकल्प अधिकारी (शिक्षण) पांडुरंग केशव ठाकरे, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, शिक्षण विस्तार अधिकारी अविनाश पाटील, छगन गुजर, मन्साराम भिल, अंकुश भिल, भरत पाटील, अभिमन गुजर, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी, शिरपूर तालुक्याचे क्रीडा समन्वयक डी. आर. पाटील, प्राचार्य एच. के. कोळी तसेच शासकीय व अनुदानित आश्रम शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक यावेळी उपस्थित होते.

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत शिरपूर तालुक्यातील ५ शासकीय व ९ अनुदानित अश्या एकूण १४ आश्रमशाळेतील ४९० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बुद्धीबळ, थाळी फेक, गोळा फेक, भाला फेक, उंच उडी, लांब उडी तसेच विविध मैदानी वैयक्तिक खेळ इत्यादी प्रकारात क्रीडा नैपुण्य सिद्ध केले.

कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी गोपाल भंडारी म्हणाले की, 'शिरपूर एज्युकेशन सोसायटी आश्रमशाळा संकुल मार्फत तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व क्रीडा क्षेत्रात सातत्याने गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे. क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण सोबतच खेळाच्या संधी उपलब्ध करून दिले जात असल्याचे नमूद केले. यानंतर शाळेतील विद्यार्थिनींनी लेझीम व अदिवासी नृत्य सादर करून सर्व क्रीडाप्रेमींना आकर्षित केले. याप्रसंगी पंच तुषार माळी, टी.डी.पावरा, ए.पी.माळी, पी.एन.बोरसे, पी.डी. पवार, सी.एन.पावरा, जे.पी.मोते, के.बी.शिंदे, डी.एस.पावरा, डी. आर.पाटील, दिनेश पाटील, विकास मुखडे, के.व्ही.पाटील, सी. एन. कोळी आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निमझरी शाळेचे शिक्षक एस.एम.भलकार, पी.डी.सोनवणे, एल.बी. चौधरी, एस.एल.निकुंभे, आर.एस.बागुल, के के पराडके, पी.आय.बडगुजर, एस.ए.गोपाळ, जी.डी. लांबर्डे, वाय. सी.पाटील, एम.बी.पाटील, अधिक्षक एस. व्ही. ठाकरे, अधीक्षिका एस.जे. पावरा, लिपिक एस.आय.पटेल, एल. बी. पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई व स्वयंपाकी यांनी प्राथमिक मुख्याध्यापक पी. एन. लोहार व माध्यमिक मुख्याध्यापक पी. डी. पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पी. एन. लोहार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.कैलास पाटील, आभार ए.पी.माळी यांनी मानले.

घर विकणे आहे

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
रविवार, दि. १ ऑक्टोबर २०२३

धुळे शहरात पैगंबर जयंती साजरी

राजकीय पक्षांकडून ठिकठिकाणी स्वागत

धुळे ।
ईद-ए-मिलाद सणानिमित्त मुस्लिम बांधवांनी शहरात भव्य मिरवणूक काढली. हातात हिरवे झेंडे घेत आग्रारोडवरुन काढण्यात आलेल्या या मिरवणुकीने धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले होते. मिरवणुकीत हजारो मुस्लिमबांधवांनी सहभाग नोंदवला. मिरवणूक मार्गावर राजकीय पक्षाच्या पदाधिकार्यांनी मिरवणुकीचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या. दरम्यान, पोलीस प्रशासनातर्फे शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. हजरत मोहंमद पैगंबर यांचा जन्मदिवस अर्थात ईद-ए-मिलाद निमित्त मुस्लिम बांधवातर्फे शहरात मिरवणूक काढण्यात आली. मच्छिबाजार येथून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत आ.फारुख शाह यांच्यासह माजी नगरसेवक शव्वाल अन्सारी, नगरसेवक अमिन पटेल, मुजफ्फर हुसेन, गुफरान पोपटवाले, डॉ.सरफराज अन्सारी यांनीही सहभाग नोंदवला. या मिरवणुकीत मुस्लिमबांधव प्रचंड संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीत डीजे, मिनी डीजे तसेच लाऊड स्पिकरवर इल्म, नात पठण सुरु होते. तसेच अल्लाह हू अकबर... च्या घोषणा देत ही मिरवणूक आग्रारोडमार्गे दाता सरकार दर्ग्याकडे मार्गस्थ होत होती. मिरवणुकीत तरुणांसह लहान मुला-मुलींचा सहभागही लक्षणीय होता. ही मिरवणुक मच्छिबाजार येथून बारापत्थरमार्गे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, आग्रारोडने प्रभाकर चित्रमंदिर, पाचकंदिल, शहर पोलीस चौकी, सराफबाजार, कराचीवाला चौक, फुलवाला चौक, महात्मा गांधी पुतळामार्गे दाता सरकार दर्गा व ईदगाह मैदान येथे दाखल झाल्यानंतर नमाज पठण करण्यात आले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त धुळे शहरात मिरवणूक

मोहमद् पैगंबर यांच्या जन्मदिनानिमित्त विविध कार्यक्रम

धुळे । नारा ए तकबीर अल्लाह हू अकबर... अशा जोरदार घोषणा देत आज आग्रारोडवरुन मुस्लीम बांधवांनी ईद ए मिलादनिमित्त भव्य जुलुस काढला. ईदचा दांडगा उत्साह दिसून आला. मुस्लीम बांधवांच्या या ईदला सर्व धर्मीयांनी चार चांद लावले. ईदच्या शुभेच्छा दिल्या. सामाजीक कार्यात सदैव अग्रेसर असलेल्या साखला परिवारातर्फे माजी नगरसेवक गोविंददादा साखला यांनी प्रभाकर टॉकीज चौकात मुस्लीम समाजाच्या जुलुसवर पुष्पवृष्टी केली. शिरा वाटप करत ईदचा आनंद द्विगुणीत केला. गोविंददादा साखला हे नेहमीच हिंदु-मुस्लीम ऐक्याचे दर्शन घडवित असतात. सालाबादाप्रमाणे यावर्षी देखील त्यांनी ईदच्या शुभेच्छा देत मुस्लीम बांधवांचे स्वागत केले. कराचीवाला खुंटाजवळ राष्ट्रवादी काँग्रेस (अजीतदादा गट) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागिरदार तसेच शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांनी जुलुसवर पुष्पवृष्टी केली.जिल्हा पोलिस अधिक्षक संजय बारकुंड यांचे स्वागत केले. त्यांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधवांचा पवित्र सण असलेल्या ईद-ए-मिलाद निमित्त शहरातून भव्य जुलूस काढण्यात आला.

संकलन : दिपक वाघ